स्थानिक स्वराज्य संस्थाच्या स्वउत्पन्नातील
अपंगासाठी राखुन ठेवलेल्या ३% अनुदान थेट
लाभार्थ्यांच्या खाती जमा करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## ग्राम विकास विभाग

**शासन निर्णय क्रमांकः व्हीआयपी-२०१६ /प्र.क्र.२४ / वित्त-३**

सार्वजनिक बांधकाम भवन, १ ला मजला
२५, मर्झबान पथ, मुंबई-४०० ००१
तारीख: २८ एप्रिल,२०१६.

वाचा :-

१) शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण २००७/प्र.क्र.४८७१/वित्त-३,दि.०५ ऑक्टोबर, २०१२.
२) शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण २००७/प्र.क्र.४८७१/वित्त-३, दि.२५ जून, २०१४.
३) शासन निर्णय क्रमांकः नगर विकास विभाग क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र.११८/ नवि-२०, दि.२८ ऑक्टोबर,२०१५
४) शासन निर्णय क्रमांकः सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. अपंग २०१५/प्र.क्र.५५/अ.क्र.२,दि.१८/११/२०१५.
५) शासन निर्णय क्रमांकः अपंग २०१५/प्र.क्र.१३७/वित्त-३, दि.२४ नोव्हेंबर,२०१५.
६) शासन निर्णय क्रमांकः व्हीआयपी २०१६/प्र.क्र.२४/वित्त-३, दि.५ एप्रिल,२०१६.

प्रस्तावना :-

संदर्भ क्रमांक ४ येथील शासन निर्णयानुसार ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था यांनी त्यांच्या ३% निधीतून घ्यावयाच्या अपंग कल्याणासाठी योजनांबाबतचा शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष विभागांर्तगत निर्गमित करण्यांत आला आहे.

जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच ग्रामपंचायत स्तरावर अपंगांसाठी ३% जिल्हा स्वनिधीमधून राबविण्यात येणाऱ्या योजनांचा निधी अपंग लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये थेट वळता करण्यांत यावा,अशी मागणी लोकप्रतिनिधी व अपंग लाभार्थी यांजकडून करण्यांत येत आहे. तसेच संदर्भ क्र. ३ येथील नगर विकास विभागाच्या दि.२८ ऑक्टोबर,२०१५ च्या शासन निर्णयाव्दारे नगर विकास विभागाचा निधी, अपंग लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये थेट जमा करण्याचे निर्देश देण्यांत आलेले आहेत. सदर बाबी विचारात घेऊन, ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थाच्या स्वनिधीमधील अपंगांसाठी ३% मधून राबविण्यात येणाऱ्या योजनांचा निधी अपंग लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये थेट वळती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

Scanned by CamScanner

**शासन निर्णय:-**

ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थानी सन २००१ च्या अपंग कल्याणकृती आराखडयातील अनुक्रमांक ९ मधील सूचनेनुसार त्यांच्या स्वउत्पन्नातील एकूण निधीपैकी ३% निधी अपंग व्यक्तींच्या कल्याण व पुर्नवसनाकरीता राखून ठेवून खर्च करावा. याबाबत ग्रामविकास विभागाने संदर्भाधीन क्र.१ , २ ,५ व ६ च्या आदेशान्वये शासन निर्णय निर्गमित केले आहेत.

ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था ( जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत ) अंतर्गत अपंग लाभ धारकांच्या योजनांसाठी, स्वउत्पन्नातील ३% निधी राखुन ठेवण्यांत येतो. सदर निधीमधून अपंग लाभार्थ्यांना वस्तूरुपात अनुदानाचे वाटप करण्यांत येते. मात्र अपंगासाठी देण्यांत येत असलेल्या वस्तूंचा दर्जा योग्य नसल्याच्या तक्रारी लोकप्रतिनिधीकडून करण्यांत येत आहेत.

सदर बाब विचारात घेऊन, संदर्भ क्र. ५ येथील दि.२४ नोव्हेंबर,२०१५ च्या शासन निर्णयातील फक्त " ब " मध्ये नमूद करण्यांत आलेल्या वैयक्तिक लाभांच्या योजनेचा निधी अपंग लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये खालील अटी व शर्ती विचारात घेवून थेट जमा करण्याची कार्यवाही करावयाची आहे

अ) शासन निर्णया सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यातील अर्ज ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थाच्या सक्षम प्राधिकरणाने निवड केलेल्या लाभार्थ्याकडून भरून घ्यावा.

आ) लाभार्थ्यांकडून विहीत नमुन्यातील अर्ज प्राप्त झाल्यानंतर, अर्जामध्ये नमूद करण्यांत आलेल्या वस्तू / साहित्याची किंमत विहीत पध्दतीने ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेने निश्चित करावी.

इ) ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सक्षम प्राधीकरणांची मान्यता घेण्यांत यावी.

ई) सक्षम प्राधीकरणांच्या मान्यतेनंतर वस्तू / साहित्याची खरेदी न करता त्याकरीता, निश्चित करण्यांत आलेल्या रक्कमेचे अनुदान जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत यांनी लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये थेट जमा करावे.

उ) अपंग लाभार्थी वास्तव्यास असलेल्या ग्रामपंचायतीमधील ग्रामसेवकाने अपंग लाभार्थ्यास दिलेल्या लाभाबाबतचा अहवाल ( खरेदीच्या पावतीसह ) ग्रामपंचायत ,पंचायत समिती तसेच जिल्हा परिषदेस सादर करावा.

सदर प्रकरणी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या स्वनिधीमधील ३% अनुदान अपंग लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये थेट जमा करताना वरील अटी व शर्तीच्या अधीन राहून संबंधितानी कार्यवाही करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०४२८१५२३४१३२२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.



Scanned by CamScanner

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vaibhav R Rajeghatge

Digitally signed by Vaibhav R Rajeghatge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Vaibhav R Rajeghatge
Date: 2016.04.28 15:41:18 +05'30'

**वैभव राजेघाटगे**
उप सचिव , महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव /सचिव ( सर्व मंत्रालयीन विभाग )
२. प्रधान सचिव,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग.
३. सर्व विभागीय आयुक्त.
४. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद ( सर्व )
५. जिल्हा परिषदांचे अध्यक्ष ( सर्व )
६. जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी ( सर्व )
७. सह/ उप सचिव ग्रामविकास व जलसंधारण विभाग( सर्व )
८. अवर सचिव / कक्ष अधिकारी, ग्रामविकास व जलसंधारण विभाग ( सर्व )
९. निवड नस्ती कार्यासन वित्त-३

Scanned by CamScanner